# प्रभु तरुण

| वर्ष ५५ | अंक १० | मुंबई | १६ जून, २०२२ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## करुनि त्यांचे झेले...

—सुहासिनी कीर्तिकर

**कृतज्ञ स्मरण**



**कै. विहंग नायक**

आपण सगळेच गोष्टीवेल्हाळ असतो. त्यामुळे अनेक गोष्टी आपल्याला आधीच ठाऊकी असतात. तुम्हा सगळ्यांना कदाचित् ठाऊक असलेलीच एक गोष्ट इथे सांगायचा मला मोह होतोय. तुम्ही म्हणाल, 'कोणती गोष्ट; ते तर सांगा.' खरंच की!

तर गोष्ट अशी - एकदा भगवान महावीर आणि त्यांचा शिष्य गोशालक कुठे तरी चालले होते. गोशालकाने अचानक एका छोट्या रोपट्यापाशी उभं राहून विचारलं, ''गुरू, या रोपट्याला फुलं येतील की नाही?'' महावीर थोडा वेळ त्या रोपट्याजवळ शांत उभे राहिले आणि म्हणाले, ''येतील''. तेव्हा तो गोशालक मोठ्याने हसला आणि ते रोपटे एकीकडे फेकत म्हणाला, 'आता कशी येतील फुले?'' महावीर फक्त हसले आणि ती दोघे पुढे चालत राहिली. जिथे जायचे तिथे पाहोचले. पण पुढे पाऊस लागला म्हणून सात दिवस तिथेच अडकून पडले अन् आल्या वाटेने माघारी परतले. मग ती जागा आली, जिथं रोप उपटून फेकून दिलं होतं. पाहतात तो काय? - त्या रोपट्यावर एक मोठं फूल फुललं होतं. गोशालक गोंधळला. ''हे कसे शक्य झाले? मी तर रोपटे उखडून टाकलं होतं!'' महावीर म्हणाले, ''मी त्या दिवशी त्या रोपाचं थांबून निरीक्षण केलं. पाहिलं तर या रोपात किती आत्मशक्ती साठली आहे! फुलाला जन्म देण्याची आणि त्यातून जगण्याची शक्ती आहे का याच्यात? मला जाणवलं की - आहे, शक्ती आहे, म्हणून तुला म्हणालो की, याला फुलं येतील. तू याला उपटलंस, फेकून दिलंस, पण ते या फुलातून आता जिवंत आहे. अधिक सुंदर रूपात.

गोष्ट आवडली? आवडली असणारच. कारण ही गोष्ट खूप काही शिकवणारी आहे. काळ जसजसा पुढे जातो तसतसे हे शिकविण्याचे अन्वय, अर्थ अधिक सघन होतात. आपल्याला नव्याने उमगतात. गोष्ट चिरंजीव होते. आता तुम्ही म्हणाल, ''आजचा नवा अन्वय कोणता? पटकन सांगा की.'' सांगते, सांगतेच. नजिकच्या भूतकाळात करोनाने आपल्या ज्ञातीतील अनेकांना कवेत घेतले. त्या विळख्यातून काहींची सुदैवाने सुटका झाली. काही मात्र गुदमरले, श्वास हरवून बसले. काळाने त्यांना त्या गोशालकासारखे उपटून फेकून दिले. आपण हळहळलो. पण ती चित्तशक्ती विनाआवाज म्हणाली, ''तरीही या रोपट्याला फूल येईल.'' त्याची प्रचिती गेल्या महिन्यात आपणा सर्वांना आलीच की.

डॉ. प्रफुल्ल गजानन विजयकर हे जगप्रसिद्ध होमियोपाथ होते. भारतात उत्तरेकडे होमियोपाथ डॉ. हनिमान या गुरूंबरोबर डॉ. विजयकरांच्या प्रतिमेचेही पूजन करून आशीर्वाद मागतात. डॉ. प्रफुल्ल यांनी घेतलेली शिबिरे, घडवलेले विद्यार्थी, बरे केलेले रुग्ण... आदींविषयी बोलावे तितके थोडेच. त्यांनी उपचार केलेले रुग्ण अगदी 'पंगुम् लंघयते गिरीम्।'' अशा नवलाईपूर्ण जादूने धडपणे जीवन जगताहेत. पण हाय! काळाने घाला घातला अन् डॉ. प्रफुल्ल गेले.




गेले? खरंच गेले? नाऽऽऽही. त्यांची आत्मशक्ती - होमियोपाथी साठून राहिली. इतकी की डॉ. अंबरीश या त्यांच्या मुलामधील होमियोपथीला फुलवणारी ठरली. काळाने त्यांचं जगण्याचं रोपटं उपटून फेकून दिलं तरी डॉ. अंबरीश या फुलातून ते जिवंत आहे. हे फूल 'सांगे वडिलांची कीर्ति।' असे म्हणत तेथेच डुलत राहिले नाही. ते उत्फुल्ल होत गेले. वडिलांची परंपरा जगभर पुढे नेत राहिले. म्हणूनच डॉ. प्रफुल्ल यांच्या प्रमाणेच डॉ. अंबरीश यांच्या कर्याचाही सन्मान होत राहिला. गेल्या महिन्यात 'प्राडक्टिव्ह होमियोपाथी'चे संचालक असलेल्या या डॉ. अंबरीश यांचा 'महाराष्ट्र टाइम्स'ने आयोजित केलेल्या सन्मान सोहळ्यात 'महाराष्ट्र गौरव पारितोषिक' देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री श्री. सुभाष देसाई यांच्या हस्ते हा सत्कार झाला. महाराष्ट्र टाइम्सच्या कॉफी टेबल 'महाराष्ट्र गौरव' पुस्तकात डॉ. अंबरीश यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. या समारंभाची दखल घेऊन डी. ही. सह्याद्री वाहिनीवरही त्यांची मुलाखत घेण्यात आली. पहा बरे; कर्तृत्वाचे फूल कसे सुंदर उमलले ते. प्रभुतरुणातर्फे त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देताना इतकेच म्हणावेसे वाटते की आणखी आणखी फुले फुलत राहोत. कर्तृत्वाचा वेल 'गगनावेरी' जाओ.

याच काळात समांतर अशी आणखी काही फुले उमलली. त्यांची गौरवशाली नोंद घेतली गेली. त्यातील एक नाव आहे - डॉ. सुमन नवलकर. त्या सातत्याने वाचकांना बालसाहित्य देत असतात. त्यावर आधारित कार्यक्रम करीत असतात. त्याची नोंद घेतली जाते. पसंतीचा




शिक्का बसतो. उदगीर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

संमेलनाला त्या काही जाऊ शकल्या नाहीत. त्यांचे नवीन पुस्तक मात्र गेले. ‘रोज नवी गोष्ट हवी’ या त्यांच्या नव्याकोऱ्या पुस्तकाचे प्रकाशन संमेलनाध्यक्ष श्री. भारत सासणे यांच्या हस्ते झाले. कित्ती कित्ती अभिमानास्पद अशी ही घटना ना? असेच ‘रोज नवे’ नसले तरी नवे नवे पुस्तक भविष्यातही प्रकाशित होत राहो.

तिसऱ्या उत्फुल्ल कर्तृत्वाची आपल्याला सुमन नवलकरांच्या कामगिरीइतकीच सवय झालेली आहे. अभिनेते श्री. श्रेयस तळपदे यांचे कलाकर्तृत्व आपल्या ज्ञातीला नवीन नाहीच. ‘पुष्पा’ सिनेमातील लोकप्रिय संवाद हिंदीत आला तो त्यांच्या आवाजात. मराठीतही आला अगदी मराठीकरण करून. अगदी ‘रताळ्या’ सारखे या मातीतले शब्द वापरून. पाठोपाठ आला त्यांचा ‘कौन प्रवीण तांबे’ हा चित्रपट. या संदर्भात त्यांची ‘एबीपी माझा’वर मुलाखत झाली. डॉ. अंबरीशप्रमाणे सह्याद्री वाहिनीवरही झाली. या दूरदर्शनवरील मुलाखतीत काही काळ संवाद साधायला होती आपली प्रभुतरुणाची कार्यकारी संपादक संजना कोठारे. छाऽऽन वाटलं की नाही या घटनांकडे पहाताना? या सर्व फुलांचे झेले करून आपण आपले सुसंस्कृतपण समृद्ध करूया. अशीच अनेक फुले उमलत राहू देत.



नुकतीच बातमी आली की सौ. वैदेही राणे या आपल्या ज्ञातीतील पहिल्या महिला बोटचालक ठरल्या. चला, पहाता पहाता आणखी एक फूल फुलले!!

✳

---

## पाठारे प्रभु सोशल समाजाचा १३२, १३३ व १३४ वा सामाईक वर्धापन दिन सोहळा

सोशल समाजाने आपला १३२, १३३ व १३४ वा सामाईक वर्धापन दिन नुकताच १५ मे २०२२ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या सभागृहात तुडुंब गर्दीत (हाऊसफुल्ल) साजरा केला. कोरोनाच्या सावटामुळे गेली २ वर्षे हा समारंभ होऊ शकला नाही. पण यावर्षी तिप्पट उत्साहात व प्रेक्षकांच्या उपस्थितीत तो साजरा झाला. प्रारंभी

(पान ६ कॉलम २ वर)

# ``WORDPLAY"

**-Armaan Kothare**

Faded, Part 1: The Chamber

**Note: The countries referred to or mentioned in this story are entirely fictitious and weren't used with the intent to hurt any person's sentiments or to target any particular group of people.**

It had been three days since the mysterious, purple coloured cardboard box was brought to the Calonian research facility, just a week after the Great war had ended. Egor and Anatoly would normally have discarded the box, but the mysterious purple fumes coming out of it compelled them not to.

Ever since the box had been brought to their chamber, Egor and Anatoly had kept a constant check on it; its sudden vigorous movements, the way the fumes fused with the air, the often light pounding noises coming from within...they noted down all of it. Every detail was to be recorded, for they couldn't risk the possibility of letting out a potential spying device. The end of the war didn't necessarily cancel out the chances of revolt attempts. They had to be a hundred percent sure before relieving it or discarding it.

That night, however, things took a sharp and unexpected turn. As the duo were about to pack up for the night, they heard loud convulsive noises originating from the box enclosure. They immediately dropped their bags and ran to the viewing gallery to see what was happening.

Just as they reached the viewing area and turned on the chamber's lights, the lid of the box violently shot up and a blurry figure emerged.

After the fumes settled, the scientists realized to their utmost shock what the figure actually was: it was a pixie.

It was as small as a clenched fist, and as soon as it came out, it started running around the whole chamber.

The scientists couldn't believe their eyes; pixies weren't real creatures! They were known only through fairytales, children's folk tales...but to see a real one right in front of them truly shocked them out of their wits. The chamber was separated from the viewing area by a one-way-mirror window, which is why the pixie couldn't see the scientists at all. It just repeatedly bumped into the glass and made squealing noises.

Anatoly decided to turn on the microphone to try and converse with the magical being, but before he could, the pixie spoke, "Greetings, Nina and Antin."

The duo, once more, stopped dead in their tracks. As if having a folk tale character jump out of a box wasn't enough, what's more; it just spoke to them!

However, Anatoly and Egor noticed that the pixie was addressing them by different names, and in the English language. Before they could turn on the microphone, yet again, the pixie spoke once more.

"I cannot sense your presence in this chamber. This chamber doesn't look familiar at all; in fact, it's so much worse. I would like to go back to your old room that we used to play in."

Anatoly couldn't quite understand English as well, so Egor took the time to translate what the pixie just said. Even after understanding the little entity's speech, the two had no idea what it was talking about.

Who were Antin and Nina? Did pixies usually speak English? Were there more where it came from? What room was it talking about?

This time, however, Egor managed to turn on the microphone before the pixie could say another word.

"Hello, this is Egor. I'm from Pentin, Calonia. I mean no harm, and neither does my friend, Anatoly. We just have some questions for you."

The pixie was bemused by the strange sounds of these men. He was only used to hearing the sounds of Nina and Antin, who were children. But, he replied, "Hello, strange man. I assume you are the twins' father. Could you please tell me where your children are, I must speak with them at once. The fate of my kingdom depends on it."

Egor was confused once more. He had no idea who these kids were, and neither did Anatoly. They decided to ask the pixie;

"We don't know which kids you are talking about, and are not their parents. Where have you come from? Were you sent by a Argenian spy? Are, the kids that you speak of, spies?"

The pixie replied, "Pardon me for thinking so; I am not a spy, and neither are Antin and Nina. They are the creators of my land...they haven't visited us in a while, and so I was sent to check on them. May I speak to them, please?"

Anatoly tried to clear his mind for a second...he found a talking pixie, who says he has a kingdom, and also claims that the creators of his kingdom are these two strange kids; what in the world was going on!?

Anatoly said, in whatever bits of English that he had learnt, "We understand that you want meet kids. Antin and Nina. We don't know them. Please tell more."

The pixie explained, "My name is Dobbie. Antin and Nina; the Gregory twins. They had created me, my fellow brethren and the lands of Anitia. However, they haven't visited His Majesty in about 10 days, and so the Royal Duke of pixies has sent me to check their condition. I request you once more to kindly allow me to speak with them. Once I confirm their well-being, I shall return to my kingdom."

It was almost dinner-time in the area, and the scientists thought it'd be wise to investigate further during the day. Egor said, "We trust your intentions, Dobbie, but due to the time of your arrival, we think it'd be better to approach the kids during the day, tomorrow. We request you to stay where you are, and wait for our arrival tomorrow."

The pixie seemed to agree, and stated that he would return the next day. And with that, he jumped back into the box. The lid flew back on shortly after, leaving behind the initial purple fumes, the mildly flickering chamber lights and the entirely confused scientist duo.

***

The following morning, Anatoly and Egor rushed to the research center to find the pixie, but were left surprised. The pixie was nowhere to be seen, instead, there was a giant bird-like figure that looked like it had just arrived. And once more, as the dust settled, the men realized what fairytale creature they were looking at.

Before them, in the chamber of the box, stood a little yet majestic red phoenix, with a bright and golden beak and sharp talons. Before Egor could turn on the microphone, yet again, the mystical being beat him to it. It produced a scroll from its mouth and flew back into the box. Once the coast was clear, Anatoly rushed into the chamber to see what it read.

*"Greetings, citizens of the overworld. The Allied Forces of the Phoenixes and the Pixies are growing restless due to the absence of Antin and Nina. We are once more requesting you to kindly bring them to our world, for our foes, ie- the Werewolves and the sea monsters are losing faith in our peace treaty. We cannot risk a war at this point in time, as the destruction would be unfathomable, and we could lose all contact with your world. Our world is at stake, but we believe in your kind.*

*Awaiting your visit,*

*The Phoenix-Pixie Council"*

The duo shut the chamber, and got into their car. Unaware of the truths and dangers that lay ahead, the scientist set off in search of the missing twins.

Make sure to read Part 2, next month…

✳

थोडं बोलू या

# वॉटस् अप नाते

-श्रेया तळपदे

**गुड मॉर्निंग**

गुड मॉर्निंग ताई... आवाजाने जाग आली. घड्याळात पाहिलं ८.३० वाजले होते. एकदम गडबडून उठले. अरे साडे-आठ वाजले कळलंच नाही. चहा बनवायचाय. नाश्ता करायचाय. एका मागोमाग एक-एक दिवसभराची काम दिसू लागली. काल दिवसभर शूट आणि उशीरा पॅकअप त्यामुळे खूप थकायला झालं होतं. पण सकाळी गुड मॉर्निंग ताई या एनरजेटीक आवाजाने जाग आली आणि कालचा थकवा निघून गेल्यासारख वाटलं

तुमचा कालचा दिवस कसाही गेला असला तरी आजचा दिवस उत्साहाने सुरु केला की छान वाटतं. आणि माझ्या प्रत्येक दिवसाची सुरुवात ही उत्साहवर्धक गुड मॉर्निंग ताई या आवाजानेच होते आणि हा आवाज असतो 'लक्ष्मी'चा

'लक्ष्मी' ही आमच्याकडे 'केर-लादी' आणि 'भांडी' या कामासाठी येते. मला अजूनही आठवतंय पहिल्यांदा कामासाठी आलेली लक्ष्मी तिला बघताक्षणी वाटलं अरे एवढी लहान मुलगी कशी इतकी काम करते? पण त्यावेळी हा प्रश्न माझ्या मनातच ठेवला मी. म्हटलं बघू कामाला यायला लागली की विचारु, ''इतक्या लहान वयात का काम करतेस?''

दुसऱ्या दिवसापासून लक्ष्मी सकाळी ८.३० ला येऊ लागली ती गुड मॉर्निंग ताई ही हाक घेऊनच. मग हळूहळू तिच्याशी बोलण व्हायला लागलं आणि जेव्हा लक्ष्मीच्या आयुष्याचा दरवाजा उघडला तेव्हा मी आवाक झाले. मला वाटलेली लहान लक्ष्मी ही मुलगी नसून बाई होती. वयाच्या १६ व्या वर्षी पळून जाऊन तिने लग्न केलं. लक्ष्मीला वडील नव्हते. तिची आई मानसिक रुग्ण होती. लहानपणापासून मायेने जवळ घेणार कोणीच नव्हतं. माणसाला जे प्रेम घरात मिळत नाही त्या प्रेमाच्या शोधात माणूस घराबाहेर पडतो. तशी लक्ष्मी बाहेर पडली आणि आपल्या प्रियकराशी लग्न केलं. तिला दोन मुलं झाली एक मुलगा, एक मुलगी लक्ष्मीला घर आणि प्रेमाची तीन माणसं मिळाली. असं तिला वाटत असतानाच तिच्या १३ वर्षांच्या संसारात एक वादळ आलं एका परस्त्रीच्या रुपात आणि तिचं हे चौकोनी कुटुंबाचं घरटं विस्कटून गेलं. नवऱ्याने केलेली प्रतारणा, मारहाण याने लक्ष्मीच्या शरीरावर व मनावर जखमा होऊ लागल्या आणि सगळ्यात मोठी यातना ही होती की ज्या माणसावरच्या विश्वासाने स्वतःच घर सोडलं. त्या विश्वासालाच तडा गेला. अशा परिस्थितीत बऱ्याचदा शिकल्या सवरलेल्या बायकाही गोंधळून जातात. पण लक्ष्मी डगमगली नाही. तिने स्वतःचा स्वाभिमान जपला. तडक नवऱ्याचं घर सोडून दोन मुलांना घेऊन आईकडे आली. इथे येऊन घरकाम करायला सुरुवात केली. आता मुलांचे संगोपन, त्यांचं शिक्षण ह्या सगळ्याच गोष्टींची जबाबदारी लक्ष्मीवर आहे. बरं आईकडे येऊनही लक्ष्मीचे त्रास कमी झाले नाहीत. आई मानसिक रुग्ण त्यामुळे ती दिवसभर लक्ष्मीच्या मुलांना सतवायची, लक्ष्मीला रात्री झोपू द्यायची नाही हे कमी होतं की काय म्हणून लक्ष्मीच्या चार मावशांनी बहिणीचे घर बळकावण्यासाठी लक्ष्मीला आणि तिच्या मुलांना घराबाहेर काढलं. तरी ही लक्ष्मी कणखर उभी राहिली. त्याच भागात एक छोटी खोली भाड्यावर घेऊन राहात आहे. भाडं देता यावं यासाठी लक्ष्मीने अजून एक दोन काम वाढवली.

इतके दुःख आणि संकटांचे डोंगर पेलूनही लक्ष्मीच्या चेहऱ्यावर कधीच नाराजी, मलूलपणा दिसत नाही. कायम हसतमुख, उत्साही लक्ष्मी मी तिला विचारलं, 'लक्ष्मी देवपण किती परीक्षा घेतोय गं तुझी?''

यावर तिने जे उत्तर दिलं, ''ताई देव कायम त्याच लोकांची परीक्षा घेतो जे त्याच्या पात्रतेचे असतात. देव कधीच कोणावर अन्याय करत नाही. तो परीक्षा घेऊन घेऊन आयुष्याची गणित सोडवण्यात तुम्हाला तरबेज करतो. जसं सोन्याला आगीतून जावं लागतं तेव्हाच त्याची चमक जगाला दिसते तसं.''

तिचं हे उत्तर मला खूप काही शिकवून गेलं. आयुष्याकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आणि आशावाद किती छोट्या-छोट्या गोष्टीने आपण खिन्न होत असतो. आपल्याकडे असणाऱ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून नसलेल्या गोष्टी घेऊन असमाधानी असतो. मला तर वाटते देवाकडे सतत तक्रार करत असणाऱ्या व्यक्तींनी हा विचार करावा की देवाने आपल्याला हे दिले ते दिले नाही या पेक्षा देवाने

(पान ६ कॉलम ४ वर)

# मुंबई बदलते आहे...

-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर
बी. आर्क. (मुंबई), फोटोजरनॅलिस्ट

इतरांच्या प्रदेशांवर आक्रमण करून लुटालूट करणे, विध्वंस करणे आणि स्वतःला जेता म्हणवून घेणे ही जगभर यवनांची पद्धतच होती. आपल्याकडे भारतातही असा यथेच्छ गोंधळ त्यांनी घातला होता, त्यांच्या अनेक मशिदींच्या घुमटांखाली आपल्या मंदिरांची दबलेली शिखरे आता उघडकीस येऊ लागलेली आहेत. इ.स. १३४८ पासून मुंबईच्या सात बेटांतही त्यांनी धुडगूस घातला होता. पण त्यांनाही इ.स. १५३४ मध्ये शिरजोर पोर्तुगीज भेटलेच, आणि मुंबईतून त्यांना पळ काढावा लागला. मात्र पोर्तुगिजांचा इथला गोंधळ जेमतेम सव्वाशे वर्षे टिकला, ही सारी सात बेटे ब्रिटिशांना इ.स. १६६५ मध्ये आंदण देऊन त्यांनी इथून काढता पाय घेतला.


राणीचे साम्राज्य जगभर कसे प्रस्थापित करता येईल या प्रयत्नात सतत गर्क असलेल्या ब्रिटिशांना, हातांत आलेली मुंबई म्हणजे पूर्वेकडच्या प्रदेशांत लागलेली लॉटरीच होती. इथेच आपला खुंटा बळकट रोवून अर्ध्या जगावर हुकूमत गाजवता येईल हे त्यांना स्पष्ट दिसत होते. मुंबईच्या सात बेटांपैकी, मधले मुंबई हे सर्वांत मोठे बेट त्यांना कारभाराला सोयीचे वाटले. पश्चिमेकडचा समुद्रकिनारा उथळ व खडकाळ असल्यामुळे, पूर्वेच्या किनाऱ्यालगत त्यांनी त्यांची कार्यालये व वस्ती उभारली. पोर्तुगीज काळात उभारलेल्या 'मॅनॉर हाऊस' नावाच्या एका मजबूत दगडी बंगल्याला संरक्षण वाढवून अठरा तोफा बसवल्या आणि 'बॉम्बे कॅसल' असे त्याचे नाव बदलून ब्रिटिश गव्हर्नर तेथे राहू लागला. ब्रिटिश वस्ती व कार्यालये यांच्या आसपास, मोठा कारभार करणाऱ्या भारतीयांनाही घरे, पेढ्या बांधायला परवानग्या दिल्या. असा मुंबईमधला कारभार सुरळित चालू असताना, ब्रिटिशांना भीती कुणाचीच नव्हती, वचक कुणाचाच नव्हता. किरकोळ लूटमाऱ्या होत असत तेव्हा त्यांचे पोलीस चोरांना पकडून शिक्षा करीत असत, आणि इथे वावरणारी जनता तर त्यांना मुजरे घालण्यांतच धन्यता मानीत असे.



मात्र, भारतभर धुडगूस घालणाऱ्या मोगलांच्या विरोधात, आपले मावळे घेऊन उभे राहिलेल्या मराठा शिवाजीच्या गोष्टी त्यांच्या कानांवर येत असत, आणि अचानक छापा मारून मारपीट किंवा लूटालूट करून अंधारातच नाहीसे होणारी ही भूतांची टोळी आहे अशा गोष्टी त्यांच्या कानांवर येत असत.

सुरतेमध्ये ब्रिटिशांच्या मोठ्या वखारी होत्या. तेथे मोगलांचे राज्य होते. शिवाजीने १६६४ मध्ये एकदा वा १६७० मध्ये दुसऱ्यांदा सुरतेवर हल्ला करून तिथल्या मोगलांना साफ लुटले, व सर्व लूट महाराष्ट्रात नेली. (मालवणजवळ समुद्रांत असलेल्या कुरटे बेटावर १६६५ मध्ये बांधकाम सुरू केलेल्या ''सिंधुदुर्ग'' या जलदुर्गाच्या खर्चासाठी सुरतेची दौलतच कामी आली होती.) तेव्हा शिवाजीने ब्रिटिशांना हातही लावला नव्हता. पण नेमकी ही भुतांची टोळी मुंबईवर धडकली तरी काय होईल? या भीतीने मुंबईच्या वस्तीभोवती संरक्षक किल्ला बांधावा असे चार्ल्स बून या गव्हर्नरने ठरवले आणि इ.स. १७१५ मध्ये त्या दृष्टीने बांधकामास सुरुवात केली. या पुढच्या भागामध्ये या किल्ल्याची माहिती घेऊ या.

*



किंग एडवर्ड याचा अश्वारूढ पुतळा अर्थात काळा घोडा

(पान ४ कॉलम ३ वर)

नवलCURRY

## (संयुक्त सदर)

## INFERNO

--**Dr. Ambuja Pradeep Navalkar**

Pain is like lava…

It incinerates…Swiftly swirling in the veins…

Delves into the crevices of the soul .Penetrates the flawed heart scorches…Accumulates in the gaping holes of your chaotic mind… Blackens thoughts... Burns away the desires, the ambitions…!

The lava pushes against the very barrier of your being...

The sulphurous fumes rising from the lava choke up your existence…!

The earth continues to move. The solid plates collide…,

Shifting the support system under your feet…!

The walls continue to come closer... pressure builds up and the bubble of insanity threatens to erupt…!

The constant cataclysmic bombardment of what is right and what is easy.

Sometimes the colliding bodies shatter...others merge. A testing time for morals and principles.

How to control these haywire demons of fire?

How to escape the hell of self-loathing? In fact, should we even try to outrun this?

Or we should allow the lava to burn away the last ounce of insecurity and acclimatize to the feeling of loss…!

Can the phoenix rise from the ashes? Like a fresh plantlet trying to escape the charred prison of the past…!

Maybe life is a volcano…

And eruption is a necessity !

Pain is lava…,Creating a remodelled architecture of your existence… !

Melting you...Reforming you Evolving you…!

Sometimes just allow the pain to flow ..!!.

## प्रार्थना..

**-सुश्री मुकुला प्रदीप नवलकर**

अगदी पहाटे पहाटे.. सूर्योदयापूर्वीच पक्ष्यांची चहक सुरू होते.

अंधुक वातावरणात कोकीळेचा पंचम आंबा, शेवगा, जांभळीला जागवतो. सोबतच जास्वंदी, अनंत, मोगरी, जाईजुई डोळे किलकिले करून दिवसाची चाहूल घेतात.

या प्रभातक्रमात फुलचुखी, चिमण्या, रावे आणि मैनाही यथावकाश सामील होतात.

ही फुले.. पाने आपल्या मूक संवादातून, हे पक्षी,आपल्या मधुर कूजनातून, त्यावेळी नेमके काय सांगत असतात?

ते एकमेकांना प्रेमसंदेश देतात? सूर्यदेवांसाठी स्वागतगीत गातात? की भोवतालच्या सृष्टीशी मैत्रीपूर्ण हितगुज करीत असतात?

ते बहुदा या प्रहरी जीवनाचा आनंदानुभव घेताना, मंजुळ स्वरात प्रभुचे गुणगान गात असावेत.

पक्षांची किलबिल, भ्रमरांचे गुंजन, अस्फुट कळ्यांचे उन्मिलीन ध्वनी, बीजांकुराचे प्रस्फुटीत हुंकार यांसारखे सृष्टीतील स्वर, ऋणाईत होत आपल्या नम्र आर्जवी निवेदनात, मनभर प्रार्थना करीत असावेत.

आपले किंचितपणा मान्य करून, भव्यदिव्यतेपुढे लीन होणे, म्हणजे प्रार्थना.

साधारणत: प्रार्थना व्यक्तीश: केली जाते तर कधी ती सामुहिक असते. तर कधी एखाद्या महानुभावाने, अवघ्या विश्वासाठी केलेली असते.

प्रार्थना ही शुचिर्भूत अंत:करणाने केलेली मंगल कामना असू शकते, परंतु प्रार्थना कधीही… कोणत्याही… भौतिक प्राप्तीसाठी असू शकत नाही.

अफाट सृष्टीचा अचाट पसारा आणि तिथे निरंतर चालणारी निर्माण प्रक्रिया आणि त्यात टिंबाएवढाच माणूस! काय काय म्हणून मागणार आपण या टीचभर आयुष्यात, फक्त स्वत:साठीच ?

त्यापरिस, आपण एकमेकांना समजून घेऊ शकतो. परस्पर स्वभावातील उणे अधिक सांभाळून घेऊ शकतो,जरी क्षमा करणे आपल्या हातात नाही !

आपण एकमेकांना सहकार्य करु शकतो, कठीणप्रसंगी सहकार आणि सांत्वना देऊ शकतो, जरी आपण कृपा करु शकत नाही.

आपण आपसात सद्भावना ठेवू शकतो, एकमेकांच्या भल्याचे चिंतन करु शकतो, जरी आशीर्वाद देऊ शकत नाही.

आपण प्रार्थना करू शकतो, जरी अनुदान, वरदान देऊ शकत नाही.

जे इतरांसाठी प्रार्थना करतात, त्यांना स्वत:साठी प्रार्थना करावी लागत नाही. जे आहे ते आनंदाने स्वीकारतात, त्यांना मागावे लागत नाही. जे मिळेल त्यात समाधानी राहून कृतज्ञही असतात, त्यांना अधिकस्य अधिकम् फलम् या न्यायाने केवळ तृप्त कृतार्थता लाभते.

हीच प्रार्थनेची अंतस्थ शक्ती आहे. वैखरीतून उमटणारी प्रार्थना, पण तिचा उगम मात्र परावाणीत असतो. काया… वाचा… आणि मनापासून केलेली प्रार्थना, कंठातून प्रकट झाली तरी हृदयीची! ऋजुता आणि अंत:करणातील संस्कारित मार्दव हाच तिचा मूलस्त्रोत असतो.

प्रार्थना, हा एक दुवा आहे.

प्रार्थनेमुळे आपण असीम… अनंत उर्जेशी जोडले जातो.

अरुप… अव्यक्ताशी संवाद साधतो म्हणूनच अमूर्त आणि आंशिक मूर्तरुप यांच्यातील निजानंदी लडिवाळ संवाद, म्हणजेच प्रार्थना.

आपल्या संस्कृतीची बैठक, ह्याच शास्त्रीय तत्त्वावर आधारित आहे.

आपली देवालये ही अंतस्थ दैहिक ऊर्जा आणि ब्रह्मांडीय परमचेतना यांचे अनुसंधान आणि एकरुपता साधण्यासाठीच उभारण्यात आली आहेत. जाणिवा समृद्ध करणारी नित्य साधना. हा आपल्या संस्कृतीचा पाया आहे आणि देहधारी सजीवांना अशा सजग जाणिवा नेहमीच दिशादर्शक ठरत आल्या आहेत.

निर्लेप निसर्गात हे सत्य पुन्हा पुन्हा अविष्कृत होते आहे आणि म्हणूनच सर्वस्वी निरलसतेने आणि अनन्यभावाने प्रकृतीशी एकतानता साधणे, हेच खऱ्या अर्थाने जगणे आहे. तेच जीवनाचे सत्त्व आहे.

तेच जीवनसूत्र आहे आणि तेच जीवनाचे सारही आहे.

*

# आयुष्यातील गमती-जमती

**-विनय त्रिलोकेकर**

(मागील अंकावरून)

### आम्ही पाच भावंडे

माझ्या भाच्याने (संजीव, तिचा मोठा मुलगा) सांगितलेला किस्सा फारच मजेशीर होता. कदाचित त्याची अतिशयोक्ती असावी. संजीव लहान होता. असेल ३री - ४थी मध्ये. शुभाचे काम आटोपले. संजीवला शाळेत सोडण्यास तसा उशीर झाला होता. ''संजू! अरे, चल लवकर. शाळेला उशीर होत आहे. भर ती पुस्तके ब्यागेत आणि चल,'' शुभा स्वत:चा एका हाताने पुस्तके दप्तरात कोंबित व दुसऱ्या हाताने संजीवचा एक हात खेचीत-ओढीत घराबाहेर नेण्यास सुरवात केली.

''पण आई, जरा थांब,'' संजीव शुभाला विनवण्या करीत होता, काही सांगू पाहत होता.

पक्कड अधिकच घट्ट करीत ती त्याला शाळेच्या दिशेने ओढू लागली. तिचे त्याच्याकडे लक्ष नव्हते.

अर्धा रस्ता पार केला. शुभाचे चालूच, ''बेल होईल. आज फार उशीर झालाय. उचल न रे पाऊल भराभर.''

संजूचे, पण आई… पण आई… चालूच होते. शाळा जवळ येताच संजीव ओरडून म्हणाला, ''पण, आई बघ की माझ्याकडे.''

आता मात्र शुभाने त्याच्याकडे बघितले.

''अरे मेल्या, हे काय? तुझे शर्ट कोठे आहे? का घातलास नाही?''

''आई, मी मगापासून तेच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. माझे शर्ट घालण्याचे बाकी होते.''

असा सारा प्रकार! मग आईने ठरवले, काही कामे वाटून घ्यावयाची. बिछाने काढणे- जो कोणी उशिरा उठेल त्याने ते काढणे. आई उठताच मीही जागा होत असे आणि आईला सांगे, 'बघ आई, मी उठलो आहे पहिला. जरा दहा मिनिटे पडतो.' मग आई इतरांना सांगे, 'विनय सर्व प्रथम उठलाय.'

बहुदा पुष्पाच उशिरा उठत असे. पण आपले बिछाने उचलण्याचे काम ती शुभावर अशा पद्धतीने टाकीत असे, ''ए शुभा, उचल न गं बिछाने माझ्या साठी. चार आणे देते.'' चार आण्याचे आमिष म्हणा किंवा मोठ्या बहिणीचा आदर, धाक, कोण जाणे? पण पुष्पा आपले काम साधायची. कदाचित मी एकदाच काढले असावेत, ते सुधा एक रुपयाच्या मोबदल्यात.

साऱ्या बहिणींनी मिळून माझ्याविरुद्ध एक कारस्थान रचले. हीन ती कारणे देत मी कोणतीच कामे करीत नाही, असे त्यांना वाटे. मग ठरवले गेले-रात्रीचे बिछाने घालण्याचे काम माझे. काही रात्री मी ते केलेदेखील. मग ते काम टाळू लागलो.अभ्यासच्या निमित्ताने मी माझ्या मित्राकडे जात असे. मुद्दाम रात्री उशीर येऊ लागलो. घरी न येता 'समोर' धराधरांकडे वेळ काढीत बसून राही. आईला झोपण्यास उशीर होऊ नये म्हणून निशा माझ्या वाटणीचे बिछाने घालू लागली. रात्री उशीर झाला की मला हाक मारण्यात यायची. खालून मी आमच्या खिडकीकडे बघायचो. काळोख पाहून अंदाज करायचो सारे झोपले असणार. मग वर जायचो आणि खरोखर बिछाने घातलेले असावयाचे. मला असुरी आनंद होत असे. पण पुष्पा-उषाला ते खपत नव्हते. आणि मग…

रात्रीचे ९ वाजले होते. मी समोरून धराधरांच्या खिडकीतून वर आमच्या खिडकीकडे पहिले. काळोख! इतक्या लवकर सारे झोपले? चला, आपणही लवकर झोपू. मी वर गेलो. दार उघडून आत शिरलो. अचानक ट्यूबलाईट लागला. सारे बिछाने घालण्यासाठी माझी वाट बघत होते! मला नोकरी लागताच पहिल्या पगारात बिछाने घालण्याकरिता रामचंद्र नावाचा मी एक गडी ठेवला.

*

# TRAVELOGUE

-Aadhar Kothare

**Picturesque wingeard – Some Vineyards**

Soma Vine Village is one of the most sought destinations in and around Nashik and has made a mark for itself for being India's first vineyard resort.In 2012, Mr. Pradeep Pachpatil (PSP), CMD, Somanda Vineyards started his first boutique winery.The white wines were launched in August 2014 after the 1st harvest in January 2014.

After a 7 year long stint with Chateau Indage, PSP came back to Nashik and bought some land on the outskirts of the city. It was on this land he planted varieties of grapes. The 25 acre land proudly boasts of 5 varieties, namely Sauvignon Blanc, Chenin Blanc, Shiraz, Cabernet and Zinfandel. In 2006, PSP built a 3bhk villa amidst the vineyards. While working with Sula, he came up with the idea of wine tourism and hence beyond, a vineyard resort was born. This 32- room property comes with 2 lavish pools and one baby pool, a vino-spa, a restaurant and a gymnasium.It has variety of luxurious rooms, villas and service apartments at the property that one can book their stay at.

Beyond Vineyard Resort took shape in 2010 and was further leased to Sula until June 2016. The resort of Soma Vine Village has two parallel buildings, comprising of a multi-cuisine Restaurants, Somras Conference Hall & Madeira Private Dining overlooking the vineyards. The winery is located right behind the complex with 20 tanks in varying sizes preserving Soma's finest wines!

In 2014 an additional 7 room villa was built mainly to cater to group and family get-togethers. This villa came with a private pool. The villa has an in-house chef, who cooks delicious home-made food.The first vintage of Soma wines was presented in January 2014 and features Chenin Blanc in two styles – one, a semi sweet variety and the other a dry variety, as well as a dessert wine made from the late harvest of the same grape. Similarly there are two styles of Sauvignon Blanc – one which is produced according to the oxidative style, which has slightly grassy flavors and the other that follows the reductive style and is slightly fruity, along with a dessert wine made from Sauvignon Blanc. Then there is Zinfandel, Shiraz, Cabernet Sauvignon, a Cabernet Sauvignon–Shiraz blend and a Rose from Shiraz.

There are many activities that one can do at the resort apart from leisure such as Grape stamping (during stamping season, wine-tasting tour, spa and Zonkers adventure park.

A perfect destination wedding place – They are available for hosting the nuptial ceremonies. They plan and host all of the wedding functions with success and all the necessary facilities that one might need in the process. The venue space is ideal for hosting the wedding functions which can range from pre-wedding, wedding, and post-wedding ceremonies. Be it an engagement, Mehendi, sangeet, Tilak ceremony, or reception they take care of all the nuptial ceremonies and wedding day.

The lawn area gives a chilly vibe where one can celebrate all the pre-wedding, wedding, and post-wedding ceremonies with happiness and allurement.

When it comes to weddings they have a wide range of services to offer to wed couples and guests and makes them enjoy the evening to the fullest. With an elegant, spacious ampi-theater they ensure the wedding is the most unforgettable experience with memories that can be cherished for life.

The wide range of facilities that they can offer you for the wedding functions includes Bridal room service staff, Guest accommodation, Good food, Multiple event spaces, which make a perfectly situated wedding venue. They ensure to deliver maximum customer satisfaction with their high-quality services.

There's no better way to put it: vineyards are beautiful! The neat rows of grapevines, pool view, open areas with bright sunshine, and the dreamy feel that is unique to vineyards are all part of what makes a vineyard such a great wedding location. It doesn't get much more romantic than a vineyard! The sweet smell of ripe grapes, the feeling of privacy, and the prevalence and availability of wine all work together to create the perfect romantic destination venue.

In Soma Vine Village, you can see the fascinating universe of wines and discover the vast historical heritage that this drink has produced over the centuries. Take a walk in our vineyards and discover all the secrets of growing and caring for vines. Apart from this, you will be able to know about various functions of the whole cycle of farming like pruning, treatment, soil work, grape flavour, and grape harvest. You can enjoy learning and discovering winemaking, breeding, aging, and bottling techniques Wine tasting is a personal experience and so should be your scheduling. You can explore the world of wines through the taste of the main wines made at the winery with the help of our professional attendants who will explain all the details of this art.

Discover a different way to learn the history and culture of wine by. Enjoy a moment of relaxation, nestled in the heart of the vineyards. Fancy basket for your picnic surrounded by nature, including artisanal cheeses, sandwiches, fruits, sweets, and the wine of your choice. Join us on this excellent wine tour to learn more about the wine, enjoy a picnic experience amid some beautiful vineyards with some of the best views strange as it may seem, our vineyard expands our facilities to accommodate large and beautiful halls. There are not only social events (birthdays, communions, destination weddings, anniversaries, etc.) but also corporate events (company dinners, retirements, meetings, and Team Building activities).

**Not only the vineyards but you can also explore the places around Soma Vine Village.**

**Zonkers Adventure Park** is the ultimate fun adventure park located in Nashik. It offers a plethora of adventure activities and fun games for both adults and children. Among the many sports and activities available in the park, the most popular ones include artificial rock climbing, go-karting, zip-lining, rappelling, and more. Zonkers Adventure Park is a must-go place when you are around some vine village for it's the best place for adventure activities and reasonably priced good service.

**The Saptashrungi Temple** has a holy atmosphere due to the sacred temple, and the locals worship the goddess Saptashrungi.This temple built in the middle of the rocks looks very beautiful and grand. The position of the Goddess facing eastward communicates peace in the environment. It is a must-visit for it's a great place and well-maintained parking arrangement.

**Gangapur Dam** is an ideal place for families, couples as well as friends. It is a must-visit and should not be missed while in Nashik This dam is ideal for boating and permission is required. There is a garden located close to this dam which serves as a perfect outing spot.

**The Coin Museum** has a fine collection of research and well-documented history of Indian Currencies. Apart from coins, collection of Ganjifa cards, furniture, painting, photographs, coral (amazing collection), terracotta's mask, copper-hoard objects, etc.

The museum showcases many of the heritage coins of intensive valuation. One can visit this museum for an interest in coin collection.

**The Pandavalaini Caves** date back to the first century BCE. The caves are considered to be the earliest examples of geological rock-cut architecture and are an important source of historical records dating back to the 6th century CE as well as the development of geological religio-us practices. One must visit when around soma vine village.

**The Trimbakeshwar Shiva Temple** is a historical and another famous place.The temple has a very divine and powerful vibration inside the sanctum sanctorum.

For Bookings and Reservations contact them at reservations.rrsv@royalorchidhotels.com and reservations@somavineyardresort.com

The location of the resort is at Survey No. 1, Village Gangavarhe, Gangapur-Gangavarhe Road, Nashik – 422222, Maharashtra, India. The best and the only way to reach the resort is by own vehicle or a pre-reserved taxi that one can use to go and come back from the resort, since there is no local transport nearby and the place is quite inside from the main highway or the Nashik city, and hence Uber/Ola services are practically not available.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शालाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

**बाळा जो जो रे**

२६-०५-२२ सौ. श्रेया आणि डॉ. विद्याधर सुनील आगासकर, कन्या, अंधेरी (पूर्व)

**विवाह सुवर्ण महोत्सव**

१४-०४-२२ श्री सुभाष बाळाराम त्रिलोकेकर, कु. डॉली मधुकर राव, खार

**नांदा सौख्यभरे**

०३-०३-२२ श्री. अभिषेक अलर्क देसाई कु. निकीता शरद राणे (आं ज्ञा.)
२४-०४-२२ श्री. चिन्मय विजीत धुरंधर, कु. अपूर्वा संदीप धुरंधर
२२-०५-२२ श्री, प्रमेय महेंद्र सूर्यकांत कीर्तिकर कु. अग्ने सँमायतीते

**मरण**

| | | |
|---|---|---|
| ०८-०३-२२ डॉ. प्रभाकर विनायक कोठारे, | वय ८२, | मालाड (मामलेदारवाडी) |
| २३-०५-२२ श्रीमती गीता (शोभना) विजयकुमार नवलकर | वय ८०, | कांदिवली |
| ३०-०५-२२ श्री. विजय यशवंतराव जयकर | वय ८९, | अंधेरी (पश्चिम) |

## प्रभुतरुणास देणगी

∗ सौ लक्ष्मीबाई आणि श्री. नानूजी विनायक धुरंधर यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती सुहासिनी दत्तकुमार धुरंधर आणि नातू सुचितकुमार धुरंधर यांजकडून रु. ३०,०००/-

∗ सौ. वैदेही श्रेयस राणे यांना सिडनी (ऑस्ट्रेलिया) येथे बोट चालविण्याचा परवाना मिळाला आणि ऑफिसमध्ये बढती मिळाली. या दुहेरी यशाबद्दल सौ. उन्नत्ती आणि श्री. उल्हास मोरेश्वर राणे यांजकडून देणगी रु. ५००/-

देणगीदारांस शुभेच्छा आणि मन:पूर्वक धन्यवाद.

✳

## अभिनंदन

∗ 'व्हीकॅन' तर्फे बावीस एप्रिल रोजी 'शांततेच्या आवाजा'वर महत्त्वपूर्ण चर्चासत्र झाले. सॉलि. राजन जयकर हे व्हीकॅनचे विश्वस्त आहेत. आयोजनात त्यांचा सहभाग होता.

∗ एक मे रोजी म्हणजे महाराष्ट्र दिनी महाराष्ट्र गीताचा नवा चित्रदर्शक साज तयार झाला. हे गीत सिद्धार्थ जाधव, अलका कुबल, प्रिया बेर्डे आदींसह प्रामुख्याने श्रेयस तळपदेवर चित्रीत झाले आहे. (त्यागराज खाडिलकर गायक आणि संगीतकार आहेत.)

∗ संवाद वाहिनीतर्फे माजी न्यायाधीश (कुटुंब न्यायालय) सौ. बागेश्री परीख यांची मुलाखत घेण्यात आली.

∗ भरारी प्रकाशनतर्फे रत्नाकर मतकरी स्मरणार्थ गूढ कथास्पर्धा घेण्यात आली. त्यात डॉ. सुमन सनवलकर यांच्या कथेला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

(पान २ कॉलम १ वरून)

सौ. कौमुदी मानकर हिच्या सुरेल स्वरात गणेशवंदना झाली त्यानंतर समाजाचे विश्वस्त श्री. माधव जयकरांनी मनोगत व्यक्त केले. प्रस्तुत संवत्सर हे शुभसंवत्सर असल्याचे सांगून त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून हा आनंद सोहळा असल्याचे नमूद केले. ''काव्य, शास्त्र, विनोदेन, संवादेन कालो गच्छति धीमताम्'' हे समाजाचे ब्रीद आहे. त्याला अनुसरून हा सोहळा आज साजरा होत आहे, असे त्या म्हणाल्या. समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. नृपाल किशोर कोठारे यांच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचा त्यांनी परिचय करून दिला. डॉ. नृपाल हे दंतवैद्यक शास्त्रातील आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांच्या चेहऱ्यावरील हास्य अधिक मोहक करण्याचे कार्य करतात असा त्यांचा गौरव करून त्यांना भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. त्यांच्या सौभाग्यवती सौ. अचला यांनाही मिष्टान्न देऊन सन्मानित करण्यात आले. समाजाच्या २ रिक्त विश्वस्तांपैकी एकावर श्री. यतिन रसिक व्यवहारकर यांची नेमणूक करण्यात आल्याचे जाहीर करून श्री. माधव जयकरांनी त्यांचे स्वागत केले. डॉ. नृपाल यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला. ''आपल्याला देवाने दिलेल्या २ हातापैकी एकाचा आपण 'घेण्यासाठी' वापर करतो पण दुसऱ्या हाताने देण्याचे आपले कर्तव्य विसरतो, त्यामुळे तो हात पांगळा होतो. तर तुम्ही तसे करू नका. असा मौलिक विचार त्यांनी मांडला. त्यांच्या हस्ते मानकऱ्यांना पदके व पारितोषिके देण्यात आली, तर सौ. अचला यांच्या हस्ते शैक्षणिक पुरस्कार विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. यावर्षी विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. उपाध्यक्ष श्री. तुषार कीर्तिकरांनी आभार प्रदर्शन केले, तर देणग्यांचे वाचन श्री. सुमेध कोठारे यांनी केले. मान्यवरांचा परिचय सौ. नीता सेंजित व श्री. जयंत कीर्तिकर या चिटणीसद्वयांनी करून दिला. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांनी उत्कृष्ट केले.

३ तास रंगलेल्या या समारंभाची सांगता राष्ट्रगीताने झाली व उपस्थितांना अल्पोपहार देण्यात आला.

कार्यक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनाबद्दल उपस्थितांनी समाजाच्या कार्यकारिणीचे कौतुक केले.

(पान ३ कॉलम २ वरून)

आपल्याला जे आयुष्य दिले आहे, जो श्वास आपण घेतोय त्याच्या कृपेने त्या प्रत्येक श्वासाला आपण सकारात्मक बनवले तर... आयुष्य जगणं जास्त सुकर होईल.

एवढं दु:ख सोसूनही त्या दु:खाची छटा चेहऱ्यावर तीळमात्रही न दाखवणारी लक्ष्मी सकाळी सात वाजल्यापासून रात्री ११ वाजेपर्यंत सतत राबणारी लक्ष्मी चेहऱ्यावर कायम सुंदर हसू असणारी लक्ष्मी माझ्या मनात उत्साहाची सकारात्मकतेची आणि आशेची चेतना जागवत राहते. त्यामुळे रोज सकाळी लक्ष्मीच्या गोड आवजातलं 'गुड मॉर्निंग' हे माझ्यासाठी चार्जर प्रमाणे वाटतं. कालच्या दिवसात डिसचार्ज झालेला मेंदू पुन्हा नव्याने चार्ज होऊन कामाला लागतो. असा 'गुड मॉर्निंगचा' चार्जर आहे का तुमच्याकडे?

अरे, तुमच्याशी बोलता बोलता गुड मॉर्निंगची गुड आफ्टरनून झाली. आता बाकी राहिलेलं पुढच्या महिन्यात थोडं बोलू या...

## प्रतिक्रिया

"Very proud of my mum Mrs Vaidehi Shreyas Rane, who has recently received a General Boat and Powered Watercraft License in Australia. We can now enjoy the beautiful Sydney harbour on a boat driven by my mum. She is the first female in our family to attain this license!"

**-Ria Shreyas Rane**
Age 10

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67